प्यारेलाल: पुन्हा एकदा सूरसाधना...



महाराष्ट्र शासनाने या वर्षीचा लता मंगेशकर पुरस्कार प्यारेलाल यांना प्रदान केल्यामुळे लक्ष्मीकांत-प्यारेलाल या जोडीच्या नावाचा पुन्हा एकदा गवगवा सुरू झाला आहे. प्यारेलाल संगीत दिग्दर्शनाच्या क्षेत्रात पुनरागमन करत असल्याचीही बातमी आहे. मुलाखतीचं प्रयोजन पुरस्काराचं असलं तरी त्यांच्या एकूण वाटचालीचा आढावा घेण्याचा एक प्रयत्न...

□ पुरस्कार मिळाल्यावर कसं वाटतंय?

– खूप आनंद झाला. पण हा पुरस्कार मिळवताना माझ्याबरोबर लक्ष्मीही असता तर तो आनंद द्विगुणित झाला असता. आज त्याची खूप आठवण येतेय. या सन्मानाचे आम्ही दोघंही समान वाटेकरी आहोत. लता मंगेशकर यांचंही आमच्या कारकीर्दीच्या जडणघडणीत मोलाचं योगदान असल्याने त्यांच्या नावाचा पुरस्कार मिळणं यासारखी समाधानाची दुसरी बाब नाही.

□ तुम्ही म्हणताय त्याप्रमाणे तुम्हा दोघांचा पुरस्कारावर समान हक्क असताना त्यावर तुमचं एकट्याचंच नाव का? लक्ष्मीकांत कुडाळकर हे नाव कुठेही दिसत नाही.

– हा प्रश्न तुम्ही माझ्याऐवजी पुरस्कार देणाऱ्यांना विचारायला हवा. मीही त्यांना हा प्रश्न विचारला होता, त्यावेळी हा पुरस्कार फक्त एकाच व्यक्तीला दिला जातो असं मला सांगण्यात आलं. त्यामागच्या राजकारणाची मला काही कल्पना नाही.

□ तसं असेल तर तुम्ही तो नाकारायला हवा होता.

– मी तसं करू शकलो असतो. पण मग लोकांनी मला घमेंडी ठरवलं असतं. शिवाय मी असं मानतो की आजही माझ्या प्रत्येक कामात लक्ष्मीकांत माझ्याबरोबरच असतो. माझ्या विनंतीवरून त्यांनी प्रवेशद्वाराला 'लक्ष्मीकांत द्वार' हे नाव दिलं होतं.

□ तुम्ही संगीत दिग्दर्शनात पुनरागमन करताय?

अलीकडेच लता मंगेशकर पुरस्कार मिळवणाऱ्या प्यारेलाल यांनी या पुरस्काराच्या निमित्ताने आपल्या भूतकाळातल्या अनेक सुरील्या आठवणी सांगितल्या...

□ विजय अकेला

– होय, खरं आहे ते. मी काही काळ आराम केला. सततच्या धकाधकीत तो आवश्यकही होता. पण म्हणून काही जणांनी मी आता निरुपयोगी झालोय असा अर्थ लावला. आता काळ बदललाय. चित्रपट संगीतातही बऱ्याच नव्या गोष्टी आल्या आहेत. मला आजच्या काळाला धरून काम करावं लागणार आहे.

□ आताही तुम्ही लक्ष्मी-प्यारे या नावानेच संगीत देणार?

– नाही. फक्त प्यारेलाल. हा निर्णय मी खूप विचारांती घेतलाय. आम्ही दोघांनी मिळून जे काम केलं त्याला तोड नाही. ते पुन्हा होणेही नाही. आता मी नव्या धर्तीवर संगीत देणार. त्यात मला यश-अपयश दोन्ही मिळण्याची शक्यता आहे. यश मिळालं तर ठीक. पण अपयश पदरी आलं तर लोकांनी लक्ष्मी-प्यारेचं संगीत ठीक नाही, असं म्हणायला नको.

□ किती प्रस्ताव आले?

– जवळजवळ सहाएक तरी आहेत. काही प्रायव्हेट अल्बमही आहेत.

□ तुमचा दिनक्रम कसा आहे?

– सकाळी आन्हिक उरकून नऊ वाजता कामाला लागतो. सध्या मी पाश्चात्त्य आणि शास्त्रीय दोन्ही संगीतावर लक्ष केंद्रित करतोय. नंतर तीन-चार गीतकारांबरोबर मीटिंग असते. त्यांच्या चांगल्या गीतांवर चाली बनवतो. मला वाटतं आता आपलं संगीत आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याची गरज आहे. मी तसा प्रयत्न करणार आहे आणि त्यात मला यश येईल याची खात्री आहे.

★ ★ ★

लक्ष्मीकांत-प्यारेलाल जोडीच्या पाच अविस्मरणीय गीतांच्या स्मृती...

१) ***'एक प्यार का नगमा है, मौजों की रवानी है, जिंदगी और कुछ भी नही, तेरी मेरी कहानी है...'***

- *शोर्* हे गाणं आम्ही किती सहजपणे बनवलं होतं. अगदी अनपेक्षितपणे ते हिट ठरलं. पण आज तेच गीत ऐकताना मला इतकं समाधान वाटतं की विचारू नका. त्याची धून प्रामुख्याने लक्ष्मीकांतनीच बनवली होती. संतोष आनंदजींचे हे शब्द दुसऱ्या कोणाला नाही तर मला आणि लक्ष्मीलाच उद्देशून होते. मी त्यात थोडे शब्द बदलून असं म्हणेन, 'लक्ष्मी! जिंदगी कुछ और नही तेरी मेरी कहानी है...'

★ ★ ★

२) *'आ जाने जा...आ...मेरा ये हुस्न जवां...'*

हे कॅबरे गीत *इंतकाम*साठी ज्यावेळी आम्ही बनवलं तेव्हा दिग्दर्शक आर.के. नय्यर, मी, लक्ष्मीकांत आणि गीतकार राजेन्द्र कृष्ण सगळे बसलो होतो. कॅबरे नृत्य नव्या धर्तीवर बसवायचा आमचा विचार होता. त्यावेळी आम्ही नुकतेच बैरुतहून परतलो होतो. तिकडे फेहरूज खान नावाची एक गायिका होती. तिची गीतांची शैली वेगळीच होती. तिच्या स्टाईलवरून प्रेरणा घेऊन लताजींच्या आवाजात मस्त गीत बसवलं. त्यात नृत्य दिग्दर्शक स्वर्गीय पी.एल. राज यांनी प्राण ओतले आणि एक अलौकिक कॅबरे नृत्यगीत आकाराला आलं.

★ ★ ★

३) *'तेरे प्यार ने मुझे गम दिया, तेरे गम की उम्र दराज हो, वो जमाना आये खुदा करे, मेरे प्यार पर तुझे नाझ हो...'*

आमच्या जोडीने *छैला बाबू* नावाच्या दोन चित्रपटांना संगीत दिलं. पहिला ६४ सालचा आणि दुसरा ७७ साली. हे गीत पहिल्या *छैला बाबू*मधलं आहे. तो *पारसमणी*च्याही अगोदर बनला, पण प्रदर्शित झालाच नाही.

माझ्या फेवरीट टॉप टेन गीतांत हे पहिल्या नंबरावर आहे. मी जेव्हा केव्हा दारू पीत असे, एकांतात हे गीत ऐकणं हा माझा छंद बनला होता. ऑल इंडिया रेडियोवर हे गीत ऐकल्यावर तुम्हीही म्हणाल, महंमद रफीचा असा आवाज दुसऱ्या कुठल्याच गीतात ऐकायला मिळाला नाही. आज हे गीत फक्त ऑल इंडिया रेडियोकडेच आहे. पण माझ्या मनात या गीताच्या अनेक स्मृती आहेत. असद भोपालींची सुरेख शायरी यात आहे. निर्मात्याची आर्थिक अडचण समजल्यावर रफीसाहेबांनी हे गीत गाण्यासाठी एक पैसाही घेतला नव्हता. संगीताप्रती असं प्रेम आज पाहायला मिळेल?

★ ★ ★

४) *'जब जब बहार आयी, और फूल मुस्कुराये, मुझे तुम याद आये...'*

*तकदीर*च्या या गीतामागेही मोठा रंजक इतिहास आहे. याचं रेकॉर्डिंग सुरू होतं. माझे वडील रामप्रसाद यांचा मला निरोप आला की काही लोकांना रेकॉर्डिंग कसं चालतं ते पाहायचं आहे. त्यांचं नीट आदरातिथ्य कर. मी पाहिलं, ६० वर्षांच्या आसपासची एक महिला सतत माझ्याशी काही ना काही बोलत होती. माझ्या कामातली त्यांची रुची पाहून मला आश्चर्य वाटलं. नंतर मला कळलं, की त्या माझ्या सासूबाई होत्या आणि माझं स्थळ पाहायला आल्या होत्या. त्यामुळे या गीताशी माझ्या भावना विशेष जोडलेल्या आहेत.

★ ★ ★

५) *'जानेवालों जरा मुड के देखो इधर, एक इन्सान हू मै तुम्हारी तरहा, जिसने सबको रचा, अपने ही रूप से, उसकी पहचान हूं, मैं तुम्हारी तरहा...'*

हे गीत माऊथ ऑर्गनचा पीस आहे. पंचमदांनी तो वाजवला होता. *दोस्ती*साठी आम्ही ते बनवलं होतं. *दोस्ती*मध्ये एकत्र काम केल्यानंतरच माझी आणि लक्ष्मीकांतची दोस्तीही गाढ बनली होती. मजरूह साहेबांचे शब्दही किती बोलके होते पाहा. त्यांनी भिकाऱ्याच्या तोंडी एक पैसा दे दो बाबा असं न म्हणता 'जानेवालो जरा मुड के देखो इधर एक इन्सान हू मै तुम्हारी तरहा...' अशी शब्दयोजना केली.

पुढे मजरूह साहेब लिहितात, 'इस अनोखे जगत की मै तकदीर हूं, मै विधाता के हाथों की तसवीर हूं, इस जहां के लिये, धरती मां के लिये, शिव का वरदान हूं, मै तुम्हारी तरहा...'

माझ्या आणि लक्ष्मीच्या मैत्रीची खोली मजरूहसाहेबांच्या गीतांतून अधिक जाणवत असे. *दोस्ती*चं हे गीत मी कसं बरं विसरेन?



विलासराव देशमुख आणि छगन भुजबळांच्या हस्ते लता मंगेशकर पुरस्कार स्वीकारताना प्यारेलाल



पुरस्कारप्रदान सोहळ्यात नौशादबरोबर प्यारेलाल: याद न जाये बिते दिनों की